# प्रेसनोट

ला.प्र. विभाग, धुळे
दिनांक २९.१०.२०२५

**लोकसेवक शैलेश विजयसिंग गावित, पोलीस हवालदार, अक्कलकुवा पोलीस स्टेशन, जि. नंदुरबार यांनी तकारदार यांचेकडे ३,०००/— रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती २,५००/— रुपये लाच स्विकारण्याचे मान्य करुन २,०००/— रुपये लाचेची रक्कम स्वत: स्विकारल्याने गुन्हा**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | धुळे |
| पो. ठाणे, गुन्हा नोंद क्रमांक | अक्कलकुवा पो. स्टे. गुरनं.     /२०२५, जि. नंदुरबार |
| कलम व गुन्हा दाखल दिनांक | भ्र.प्र. कायदा कलम ७ प्रमाणे, दि. २९.१०.२०२५ |
| आरोपीचे नांव, वय व कार्यालय | शैलेश विजयसिंग गावित, ५३ वर्ष, पोलीस हवालदार, ब.नं. ८६७, नेमणुक अक्कलकुवा पोलीस स्टेशन, रा. २२ए, शंकर नगर, दुधाळे शिवार, कोकणी हिल, नंदुरबार |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | २,०००/— रुपये |

**थोडक्यात हकिगत :—** तक्रारदार यांच्या भावाविरुध्द एका महिलेने दिलेल्या तकारीवरुन अक्कलकुवा पोलीस स्टेशन येथे दि. ०१.१०.२०२५ रोजी आलोसे शैलेश गावित यांनी एनसी केस दाखल केली होती. सदर एनसी केसची चौकशी सहा. पोलीस उप निरीक्षक महेंद्र जाधव यांच्याकडे होती. सदर केस दाखल केलेनंतर आलोसे गावित व सहा. पोलीस उप निरीक्षक जाधव यांनी तकारदार यांच्या भावावर चॅप्टर केस न करण्यासाठी ३,०००/— रुपये घेतले होते. त्यानंतर तकारदार हे अक्कलकुवा पोलीस स्टेशन जवळुन जात असतांना तकारदार यांची आलोसे गावित यांचेशी भेट झाली. तेव्हा आलोसे यांनी तकारदार यांना "तु फक्त ३,०००/— रुपये दिलेले आहेत, तुला अजुन ३,०००/— रुपये दयावे लागतील, पैसे दिले नाही तर तुझ्या भावावर चॅप्टर केस दाखल करुन त्याला अटक करतो" असे सांगुन ३,०००/— रुपये लाचेची मागणी केली असल्याची तकारदार यांनी दुरध्वनीव्दारे माहिती दिली होती. सदर माहितीवरुन धुळे ला.प्र. विभागाच्या पथकाने अक्कलकुवा येथे जावुन तकारदार यांची तकार नोंदवुन घेतली.

सदर तकारीवरुन पडताळणी केली असता पोलीस हवालदार शैलेश गावित यांनी तकारदार यांच्याकडे पंचांसमक्ष ३,०००/— रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती २,५००/— रुपये लाच स्विकारण्याचे मान्य केले होते.

त्यानंतर सापळा कारवाई दरम्यान पोलीस हवालदार शैलेश गावित यांनी तकारदार याच्याकडुन २,०००/— रुपये लाचेची रक्कम स्वत: स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

| | |
|---|---|
| सापळा पर्यवेक्षण अधिकारी | सचिन साळुंखे, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि. धुळे<br>मो. नं. ९८३४२०२९५५, ९४०३७४७१५७ |
| सापळा अधिकारी | पद्मावती कलाल, पोलीस निरीक्षक |
| सापळा पथक | यशवंत बोरसे, पोलीस निरीक्षक,<br>पोहेकॉ. राजन कदम, मुकेश अहिरे, प्रविण मोरे, संतोष पावरा, पोकॉ. मकरंद पाटील, प्रविण पाटील, सागर शिर्के, पोहेकॉ. सुधीर मोरे |
| मार्गदर्शन | १) मा. श्री भारत तांगडे, पोलीस अधीक्षक<br>२) मा. श्री. माधव रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक<br>३) मा. श्री. सुनिल दोरगे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकिय/ निम शासकिय अधिकारी / कर्मचारी अथवा खाजगी पंटर यांनी काम करुन देण्यास लाचेची मागणी केल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे संपर्क साधावा.

**"लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे आपले सेवेशी सदैव तत्पर"**


संपर्क पत्ता :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे
संकेतस्थळ :— acbmaharashtra.gov.in
ईमेल :— dyspacbdhule@gmail.com
टोलफ्री कमांक :— १०६४
दुरध्वनी कमांक :— ०२५६२—२३४०२०

(सचिन साळुंखे)
पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,धुळे.


Scanned with OKEN Scanner